सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर



नॅक व्दारा ‘ब+’ श्रेणी प्राप्त शासकीय संस्था

## माहिती-पत्रक

२०२३-२०२४


डॉ.साधना शिलेदार

संचालक

Email - directorvngiass@rediffmail.com

Website - www.vngiassnagpur.org

दूरध्वनी क्रमांक

प्रबंधकाचे कार्यालय - २५६५६५८


(किंमत ४० रुपये)


LIBRARY & INFORMATION
RESOURCE CENTRE








प्रशासकीय
कार्यालय


स्वातंत्र्य भवन


वसंतराव नाईक शासकीय कला व
समाज विज्ञान संस्था, नागपूर
राष्ट्रीय सेवा योजना




महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर आणि
द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशन इंडिया
यांच्या संयुक्त विद्यमाने
संपर्क




वार्षिक क्रीडा दिन
REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA


उपहार गृह




## संचालकांचा संदेश

कला व समाजविज्ञान या क्षेत्रांमध्ये आपला वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवणाऱ्या व १३८ वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या या शासकीय संस्थेत आपले सर्वांचे मन:पूर्वक स्वागत.

आठ भाषा,संगीतासारखी ललित कला व सामाजिक शास्त्रे यांच्या अध्ययनामुळे महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था म्हणून ही संस्था ओळखली जाते.

११ वी ते **Ph. D.** पर्यंत अध्ययन करीत असलेले ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी हे या संस्थेचे बलस्थान आहे.

संचालक,
डॉ. साधना शिलेदार

## महाराष्ट्र शासन

## वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था,

## रिझर्व्ह बँक चौक, पं. नेहरू मार्ग, नागपूर-४४० ००१

**दूरध्वनी (कार्या.) ०७१२-२५६५६५८**

**संचालक : डॉ. साधना शिलेदार**

**वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची यादी**

| अनुक्रमांक | विषय | प्राध्यापकांचे नाव | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | डॉ. कपिल सिंघेल | सहयोगी प्राध्यापक |
| २ | | डॉ. सोमनाथ बरुरे | सहाय्यक प्राध्यापक |
| ३ | | डॉ. हरिश तापडीया | सहाय्यक प्राध्यापक |
| ४ | | प्रा. गोविंद राठोड | सहाय्यक प्राध्यापक |
| ५ | | प्रा. शेखर विसपुते | सहाय्यक प्राध्यापक |
| ६ | मराठी | डॉ. विशाखा कांबळे | सहयोगी प्राध्यापक |
| ७ | | डॉ. सुधीर मोरे | सहाय्यक प्राध्यापक |
| ८ | | प्रा. उत्तरेश्वर सुरवसे | सहाय्यक प्राध्यापक |
| ९ | अरेबीक | डॉ. शफिक खान युसुफ खान पठाण (अति.कार्यभार) | सहाय्यक प्राध्यापक |
| १० | उर्दू | डॉ. नुसरत मिनू (अति.कार्यभार) | सहाय्यक प्राध्यापक |
| ११ | | डॉ. शेख इमरान शेख मस्तान | सहाय्यक प्राध्यापक |
| १२ | पर्शियन | डॉ. मनोहर कुंभारे (अति.कार्यभार) | प्राध्यापक |
| १३ | संस्कृत | डॉ. अरुण पवार | सहाय्यक प्राध्यापक |
| १४ | | डॉ. पल्लवी कर्वे | सहाय्यक प्राध्यापक |
| १५ | | डॉ. संभाजी पाटील | सहाय्यक प्राध्यापक |
| १६ | | डॉ. मंजुषा कुलकर्णी | सहाय्यक प्राध्यापक |
| १७ | पाली | डॉ. मनोहर कुंभारे | प्राध्यापक |
| १८ | भूगोल | डॉ. मेघा सावरकर | सहयोगी प्राध्यापक |
| १९ | | डॉ. सीमा मालेवार | सहाय्यक प्राध्यापक |
| २० | | डॉ. सुजाता दामके | सहाय्यक प्राध्यापक |
| २१ | | डॉ. सुषमा दामोदरे | सहयोगी प्राध्यापक |
| २२ | | डॉ. अविनाश तलमले | सहयोगी प्राध्यापक |
| २३ | | डॉ. संदीप मसराम | सहाय्यक प्राध्यापक |

| | | | |
|---|---|---|---|
| २४ | हिंदी | डॉ. रेणु बाली | प्राध्यापक |
| २५ | समाजशास्त्र | डॉ. प्रमिला भुजाडे | सहयोगी प्राध्यापक |
| २६ | अर्थशास्त्र | डॉ. प्रमोद लाखे | सहयोगी प्राध्यापक |
| २७ | | प्रा. गौतम धुळधुळे | सहाय्यक प्राध्यापक |
| २८ | तत्त्वज्ञान | डॉ. राजेसाहेब मारडकर | प्राध्यापक |
| २९ | | डॉ. रिना बावणकुळे | सहाय्यक प्राध्यापक |
| ३० | | प्रा. स्मिता बैतुले | सहाय्यक प्राध्यापक |
| ३१ | | डॉ. उध्दव कांबळे | सहाय्यक प्राध्यापक |
| ३२ | राज्यशास्त्र | डॉ. राहुल बावगे | प्राध्यापक |
| ३३ | | डॉ. संजय कानिंदे | सहाय्यक प्राध्यापक |
| ३४ | | डॉ. अनिल बनकर | सहयोगी प्राध्यापक |
| ३५ | मानसशास्त्र | डॉ. शफिक खान युसुफ खान पठाण | सहाय्यक प्राध्यापक |
| ३६ | | डॉ. आश्विन जैस्वाल | सहाय्यक प्राध्यापक |
| ३७ | गृहअर्थशास्त्र | डॉ. अनुराधा निसळ | प्राध्यापक |
| ३८ | | डॉ. अद्विता देशमुख | प्राध्यापक |
| ३९ | संगीत | डॉ. साधना शिलेदार | प्राध्यापक |
| ४० | | डॉ. बुद्धरत्न लिहितकर | सहाय्यक प्राध्यापक |
| ४१ | इतिहास | डॉ. देवीदास गाडेकर | सहाय्यक प्राध्यापक |
| ४२ | प्राचीन इतिहास | डॉ. आशिष शेंडे | सहाय्यक प्राध्यापक |
| ४३ | शारीरिक शिक्षण | डॉ. दिपपालसिंह सोनटक्के | शा. शि. संचालक |
| ४४ | ग्रंथालय | डॉ. सुषमा दामोदरे (अति.कार्यभार) | ग्रंथपाल |

**कनिष्ठ महाविद्यालयातील अधिव्याख्यात्यांची यादी**

| अ. क्र. | विषय | अधिव्याख्यात्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | डॉ. मल्लिकार्जुन लोणी | अधिव्याख्याता गट-ब |
| २ | हिंदी | श्रीमती कुंदा काळबांडे | ____ " ____ |
| ३ | समाजशास्त्र | श्रीमती किरण नागपूरे | ____ " ____ |
| ४ | भूगोल | श्री. अजयकुमार बोरसे | ____ " ____ |

## वर्ग ३ कर्मचा-यांची यादी

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. प्रमोद लाखे | प्रबंधक (अतिरिक्त कार्य.) |
| २ | श्री. भूषण मंजुळे | मुख्य लिपिक |
| ३ | श्रीमती सुहासिनी ठाकरे | अधीक्षक (प्रति नि. सहसंचालक कार्यालय, नागपूर) |
| ४ | डॉ. मंदा पाटील | सहाय्यक ग्रंथपाल |
| ५ | श्रीमती वनमाला कापसे | वरिष्ठ लिपीक |
| ६ | श्री. संदीप राऊत | कनिष्ठ लिपिक |
| ७ | श्री. उमाकांत महाजन | कनिष्ठ लिपिक (प्रतिनियुक्ती) |
| ८ | श्री. प्रशांत पोपटकर | संगीत सहाय्यक |
| ९ | श्री. प्रदीप पिल्ले | वाद्यवादक |

## वर्ग ४ कर्मचा-यांची यादी

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. अरविंद मांडवकर | ग्रंथालय परिचर |
| २ | श्री. प्रकाश वानखेडे | ग्रंथालय परिचर |
| ३ | श्रीमती कामीनी ऊकरे | ग्रंथालय परिचर |
| ४ | श्री. विलास जावळे | ग्रंथालय परिचर |
| ५ | श्री. अतुल राऊत | ग्रंथालय परिचर |
| ६ | श्री. रणजीत मोहबे | शिपाई |
| ७ | श्री. मनोज वरखडे | शिपाई |
| ८ | श्री. आनंदमणी आर्य | शिपाई |
| ९ | श्री. ईश्वर जांगडे | शिपाई |
| १० | श्री. उमेश जवादे | शिपाई (प्रति. नियुक्ती सहसंचालक कार्यालय, नागपूर) |
| ११ | श्री. उद्धव तितरे | शिपाई |
| १२ | श्रीमती शशीकला दंडारे | शिपाई |

## शैक्षणिक नियोजन

### सत्र २०२३-२४

| | | |
|---|---|---|
| सत्र आरंभ | : | १६ जून २०२३ |
| जून | : | सत्र आरंभ, १२ वी, B.A., M.A. चे निकाल व प्रवेश |
| जुलै | : | निकाल व प्रवेश |
| ऑगस्ट | : | अध्ययन मंडळाचे उद्घाटन, induction meeting |
| सप्टेंबर | : | पालक सभा |
| ऑक्टोबर | : | प्रथम घटक चाचणी, विद्यार्थी संसद उद्घाटन |
| नोव्हेंबर | : | द्वितीय सत्र आरंभ |
| डिसेंबर | : | गुणवंत विद्यार्थी सत्कार |
| जानेवारी | : | आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन, स्नेहसंम्मेलन |
| फेब्रुवारी | : | द्वितीय घटक चाचणी |
| मार्च | : | सराव परीक्षा |
| एप्रिल | : | प्रात्यक्षिक परीक्षा, ११ वी १२ वी च्या परीक्षा |
| मे | : | द्वितीय सत्र अखेर |
| जून | : | उन्हाळी अवकाश |

* परीक्षा निकाल व प्रवेशांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राहील.

## अनुक्रमणिका


| अ. क्र. (१) | | विषय (२) | | | पृष्ठे (३) |
|---|---|---|---|---|---|
| १ | | संस्थेचे शैक्षणिक वर्षारंभ | .. | .. | १ |
| २ | | प्रवेश – सामान्य नियम | .. | .. | १ |
| ३ | (१) | प्रवेश – कनिष्ठ महाविद्यालय | .. | .. | २ |
| | (२) | प्रवेश – पदवी वर्ग | .. | .. | ३ |
| | (३) | प्रवेश – पदव्युत्तर वर्ग | .. | .. | ४ |
| ४ | | शुल्क | .. | .. | ५ |
| ५ | | वसतिगृह | .. | .. | ९ |
| ६ | | ग्रंथालय व त्याचे नियम | .. | .. | १४ |
| ७ | | ११ वा वर्ग उत्तीर्ण होण्याबाबत नियम | | .. | १५ |
| ८ | | अभ्यासक्रमाचे विषय | .. | .. | १६ |
| ९ | | रातुम विद्यापीठ पुरस्कृत संशोधन केंद्र | | .. | १८ |
| १० | | फेलोशिप, शिष्यवृत्त्या आणि पारितोषिक | | .. | २० |
| ११ | | महत्त्वाचे नियम | .. | .. | २३ |
| १२ | | शारीरिक शिक्षण विभाग | .. | .. | २४ |
| | (१) | वैद्यकीय तपासणी | .. | .. | २४ |
| | (२) | शारीरिक क्षमता चाचणी | .. | .. | २४ |
| | (३) | खेळाडूंना प्रोत्साहन गुण | .. | .. | २४ |
| १३ | | राष्ट्रीय छात्रसेना | .. | .. | २४ |
| १४ | | राष्ट्रीय सेवा योजना | .. | .. | २५ |
| १५ | | स्काऊट व गाईड | .. | .. | २५ |
| १६ | | विद्यार्थी कल्याण योजना | .. | .. | २६ |
| १७ | | सामान्य नियम | .. | .. | २६ |
| १८ | | विद्यार्थी परिषद | .. | .. | २७ |
| १९ | | शिस्त पालनाचे विशेष नियम | .. | .. | २७-२९ |

(२०२३-२४)

**१. संस्थेचे शैक्षणिक वर्षारंभ :**

दिनांक १६ जून २०२३ रोजी शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ होईल.

**२. संस्थेत प्रवेशासंबंधी सामान्य नियम :**

(१) प्रवेशासाठी केले जाणारे सर्व अर्ज माहितीपत्रकात असलेल्या हिरव्या प्रवेश अर्जातच असणे आवश्यक आहे. प्रत्येक अर्ज प्रवेशार्थीने स्वतःच्या हस्ताक्षरातच लिहिलेला असावा आणि त्यावर माहितीपत्रकात प्रवेशासाठी घातलेल्या अटींना संमती दर्शविण्यासाठी वडिलांची / आईची प्रवेशेच्छूकाची जबाबदारी स्वीकारणा-या पालकांची सही असावी.

(२) प्रवेश अर्जावर विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतेवेळी काढलेला रंगीत फोटो लावावा. (जुने व ब्लॅक ॲन्ड व्हाईट फोटो लावू नये.) फोटोच्या दोन प्रती द्याव्यात.

(३) तृतीय पंथी (Third Gender) विद्यार्थी/विद्यार्थ्यांना आवश्यक कागदपत्रांसह प्रवेश देण्यात येईल.

(४) प्रवेश घेतेवेळी प्रवेश घेऊ इच्छिणारा विद्यार्थी स्वतः हजर असणे अनिवार्य आहे.

(५) जे अर्ज (अ) विहित नमुन्यात भरलेले नाहीत किंवा (ब) योग्यरितीने किंवा पूर्णपणे भरलेले नाहीत किंवा (क) ज्यांच्या सोबत आवश्यक कागदपत्रे (ड) ओळखपत्रासाठी विहित नमुना [ माहितीपत्रकातील परिच्छेद २ (६) ते २ (११) पहा ] जोडलेले नाहीत अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(६) आई / वडील किंवा पालक यांची बनावट सही करण्याचा प्रयत्न केल्यास तो प्रवेशेच्छूक प्रवेश देण्यास अयोग्य समजण्यात येईल आणि त्याला प्रवेश दिला असेल तर तो रद्द करण्यात येऊन त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

(७) अर्जाला जोडलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रातील किंवा शपथपत्रातील कोणतेही विधान खोटे असल्यास, प्रवेशेच्छूक प्रवेश देण्यास अयोग्य समजण्यात येईल आणि त्याला प्रवेश दिलेला असला तरी तो रद्द केला जाईल. पुढे त्याच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

(८) महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ या व्यतिरिक्त किंवा नागपूर विद्यापीठाव्यतिरिक्त बाहेरुन येणा-या विद्यार्थ्यांना अर्जासोबत दुस-या मंडळाचे / विद्यापीठाचे स्थलांतर प्रमाणपत्र जोडावे लागेल.

(९) ज्या विद्यार्थ्यांनी शेवटची परीक्षा बहिःशाल विद्यार्थी म्हणून दिलेली असेल त्यांना राजपत्रित अधिका-याचे चांगल्या वर्तनासंबंधीचे प्रमाणपत्र जोडावे लागेल.

(१०) अर्जाचे शुल्क भरल्यासंबंधीची संस्थेच्या कार्यालयातील रोख पावती अर्जासोबत असल्याशिवाय अर्ज स्वीकारला जाणार नाही.

(११) तात्पुरता प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची यादी सूचनाफलकावर लावण्यात येईल. प्रवेश शुल्क व आवश्यक ती प्रमाणपत्रे दिल्यानंतरच हा प्रवेश अंतिम समजला जाईल. कोणालाही मुलाखतपत्रे पाठविली जाणार नाहीत.

(१२) विद्यार्थी शेवटी जेथे शिकत होता ती शाळा / महाविद्यालय सोडल्यासंबंधीचे मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांची सही असलेले मूळ प्रमाणपत्र प्रवेश घेतेवेळी जमा करावे. डुप्लिकेट टी. सी. च्या आधारे सामान्यतः प्रवेश दिला जाणार नाही.

(१३) प्रवेश अर्ज करतेवेळी **मूळ प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती** सादर कराव्यात. प्रवेश अर्जासोबत जोडलेली कोणतीही कागदपत्रे परत केली जाणार नाहीत. त्यामुळे आवश्यक तेवढ्या झेराक्स प्रती पुढील कामासाठी आपल्या जवळ ठेवाव्यात.

(१४) अर्जदाराने शेवटची परीक्षा उत्तीर्ण केल्याचा स्पष्ट उल्लेख असलेला समाधानकारक पुरावा, तसेच शिक्षणात खंड (Gap) पडला असल्यास, या कालावधीचे स्पष्टीकरणात्मक अधिकृत शपथपत्र (ॲफिडेव्हिट) जोडावे.

(१५) पूर्वी ज्या वर्गात विद्यार्थी शिकत होता त्याच वर्गात त्याला पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही.

(१६) प्रवेश मिळाल्याबरोबर ताबडतोब संस्थेच्या शुल्काचा पहिला हप्ता त्याच दिवशी भरावा लागेल. न भरल्यास प्रवेश रद्द समजला जाईल.

(१७) विदेशातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याबाबत त्याला विद्यापीठातून पत्र आणल्याशिवाय संस्थेतील कोणत्याही वर्गात प्रवेश दिला जाणार नाही.

(१८) प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना काही आजार असेल तर त्याचा उल्लेख करावा.

(१९) महाराष्ट्र राज्याबाहेरील विद्यार्थ्यांनी ते ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहात असतील तेथील ठाणेदाराचे चांगल्या वर्तणुकीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२०) संचालक, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर यांना या संस्थेत एखाद्या विद्यार्थ्याला कोणत्याही वर्गात प्रवेश देण्याचा किंवा प्रवेश नाकारण्याचा अधिकार आहे. तसेच वरील सर्व नियमात बदल करण्याचा संचालकांना संपूर्ण अधिकार आहे. या संबंधात संचालकांचा निर्णय अंतिम राहील.

**३. प्रवेश :**

**(१) कनिष्ठ महाविद्यालय :**

(म. रा. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या नियमांच्या अधीन राहून)

प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणारा विद्यार्थी म. रा. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) उत्तीर्ण असावा किंवा त्या मंडळाने समकक्ष मानलेली परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून मिळणारे समकक्ष प्रमाणपत्र **(Equivalence Certificate)** सोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच स्थानांतर प्रमाणपत्र (Migration Certificate) शिवाय प्रवेश दिला जाणार नाही.

अर्जासोबत अर्हताकारी परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत आणि प्रवेश-सामान्य नियम २(६)ते २(११) यांत नमूद केलेली कागदपत्रे जोडून तो, महाराष्ट्र राज्य मा. व उ. मा. शिक्षण मंडळाचा माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यावर ताबडतोब सादर करावा. इयत्ता ११ वी चे प्रवेश केंद्रीय पद्धतीने होतील.

द्वितीय वर्ष कनिष्ठ महाविद्यालय (१२वी) मध्ये प्रवेशासाठी प्रवेश अर्जासोबत अर्हताकारी परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत आणि वरील परिच्छेद २(६) ते २ (११) यात नमूद केलेली कागदपत्रे जोडून तो अर्ज, संचालकांनी प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालय (११ वी) निकालाच्या वेळी जाहीर केलेल्या तारखेच्या आत सादर करावा.

कनिष्ठ महाविद्यालय प्रथम वर्षाकरिता (११ वी) प्रवेश घेताना विषयांची निवड काळजीपूर्वक करावी. एकदा घेतलेल्या ऐच्छिक विषयांत नंतर बदल करून दिला जाणार नाही. तसेच सत्राच्या प्रारंभी विद्यार्थ्याचे नाव ज्या तुकडीमध्ये समाविष्ट करण्यात आले असेल त्याच तुकडीमध्ये राहील, बदलवून दिले जाणार नाही.

**३.२ पदवी वर्ग :**

(रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या नियमांच्या अधीन राहून)

खालील तक्त्यात दर्शविलेल्या अर्हताकारी परीक्षा विविध वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्याने उत्तीर्ण केल्या असल्या पाहिजेत :—

| **वर्ग** | **अर्हताकारी परीक्षा** |
|---|---|
| बी. ए. भाग– १ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा. (१२ वी) |
| बी. ए. भाग– २ | बी. ए. भाग– १ |
| बी. ए. भाग– ३ | बी. ए. भाग– २ |
| एम. ए. भाग– १ | पदवी परीक्षा उत्तीर्ण विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनानुसार |
| एम. ए. भाग– २ | एम. ए. भाग– १ |

**टीप** :– १. महाराष्ट्र राज्य मा. व उ. मा. शिक्षण मंडळाने/विद्यापीठाने वरील परीक्षांच्या समकक्ष मानलेल्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाही प्रवेशाकरिता अर्ज करता येईल. त्यासाठी पात्रता प्रमाणपत्र (Eligibility Certificate) जोडणे आवश्यक आहे.

२. अर्हताकारी परीक्षा अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला, विद्यापीठाने पुढील वर्गात अभ्यास सुरू ठेवण्याची परवानगी (ए.टी.के.टी.) दिलेली असल्यास, प्रवेशासाठी अर्ज करता येईल.

३. बी. ए. भाग-१ व एम. ए. भाग-१ या वर्गातील सर्व जागा गुणवत्तेनुसार व शासकीय नियमानुसार केंद्रीय प्रवेश पद्धतीने भरल्या जातील.

४. अर्जासोबत अर्हताकारी परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत आणि वरील प्रवेश-सामान्य नियम २(६) ते २ (११) यात नमूद केलेली प्रमाणपत्रे जोडून अर्ज अर्हताकारी परीक्षेचा निकाल लागल्याबरोबर सादर करून आपला प्रवेश निश्चित करावा.

५. बी. ए. (भाग-१) या वर्गात प्रवेश घेताना विषयांची निवड काळजीपूर्वक करावी. प्रवेश निश्चितीनंतर विद्यार्थ्यास विषयांत बदल करून मिळणार नाही. **(विद्यापीठाच्या परीक्षेचा अर्ज भरताना विषय बदलल्यास व तो नाकारला गेल्यास, विद्यार्थी स्वतः जबाबदार राहील).**

६. बाहेरील विद्यापीठातून आलेल्या प्रवेशेच्छूक विद्यार्थ्यांनी या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी नागपूर विद्यापीठाकडून समकक्ष (Equivalence Certificate) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

७. विद्यार्थांच्या आधार कार्ड ची सत्यप्रत.

८. राष्ट्रीयकृत बँकेचे खाते क्रमांक व नाव असलेल्या पानाची पास बुकमधील सत्यप्रत.

९. वर्ग ११, बी. ए. (भाग-१) व एम. ए. (भाग-१) या वर्गातील प्रवेशांचे आरक्षण खालीलप्रमाणे राहील :—

(शासन निर्णय क्र. यु.एस.जी.-१४९३-(२४-२८)-विशी-४, दिनांक २२ जून १९९५ अनुसार)

| **अ. क्र.** | **जाती** | **शेकडाप्रमाणे** |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (अ) | अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) | १३ % |
| (ब) | अनुसूचित जमाती (ST) | ७ % |
| (क) | विमुक्त जाती (१४ तत्सम जमाती) (V.J./ N.T.) | ३ % |
| (ड) | भटक्या जाती (NT-B) | २.५ % |
| (इ) | भटक्या जमाती (धनगर व तत्सम) (NT-C) | ३.५ % |
| (फ) | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम) (NT-D) | २ % |
| (ज) | विशेष मागासप्रवर्ग (SBC) | २ % |
| (ग) | इतर मागासवर्गीय (ओ. बी. सी.) (OBC) | १९ % |
| (द्य) | सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग (SEBC) | १९ % |

(शासनाच्या निर्णयानुसार यात बदल केला जाऊ शकतो.)

**टीप** :–(१) तत्कालीन शासन निर्णयानुसार आरक्षण ठेवण्यात येईल. शासन निर्णय बदलल्यास त्यानुसार आरक्षणात बदल होईल. प्रवेशाच्या संदर्भात संचालकांचा निर्णय अंतिम राहील.

(२) आजी/माजी सैनिकांच्या मुलांना संस्थेत एकूण प्रवेश क्षमतेपैकी ५ % जागा आरक्षित आहेत.

(शासन निर्णय क्र. २००६-२४१/०६, दिनांक १० सप्टेंबर २००७ अनुसार)

(३) इयत्ता ११ वी च्या प्रवेशासाठी ५ % जागा क्रीडा क्षेत्रात जिल्हा/राज्य/राष्ट्रीय पातळीवर प्रथम/द्वितीय क्रमांकावर आलेल्या विद्यार्थ्यांना आरक्षित आहेत. (शासन निर्णय क्र. एचएससी-१७०७-२२२-०७, दिनांक २६ जून २००८ अनुसार)

(४) अपंग विद्यार्थ्यांना शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे प्रवेश देण्यात येईल.

**३.३. पदव्युत्तर वर्ग प्रवेश विद्यापीठामार्फत केंद्रीय पध्दतीने होतील.**

१. एम. ए. (भाग-१) प्रवेश अर्जासोबत बी. ए.-१, बी. ए.-२ व बी. ए.-३ ह्या तिन्ही वर्गांच्या गुणपत्रिकांच्या सत्यप्रती सादर करणे आवश्यक आहे.

२. संस्थेतून वा बाहेरून एका विषयांत एम. ए. झालेल्या विद्यार्थ्यास दुस-या विषयासाठी संस्थेत सामान्यतः प्रवेश दिला जाणार नाही.

३. एम. ए. (अर्थशास्त्र) व गृहअर्थशास्त्र ह्या वर्गात प्रवेशासाठी अर्थशास्त्र/गृहअर्थशास्त्र हा विषय घेऊन बी. ए. झालेल्या विद्यार्थ्याला प्रथम प्राधान्य देण्यात येईल. बी. कॉम., बी. एस्सी. (कृषी), बी. ए. (रुरल सर्व्हिसेस), बी. एस्सी. (गृहशास्त्र) या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी नंतर विचार करण्यात येईल.

४. एम. ए. (भाग-२) ह्या वर्गात प्रवेश घेऊ इच्छिणारा विद्यार्थी नागपूर येथील अन्य संस्थांतून एम. ए. (भाग-१) उत्तीर्ण झालेला असल्यास, त्याला तेथील विभागप्रमुख/प्राचार्य यांचे ' ना हरकत प्रमाणपत्र ' प्रवेश मागतेवेळी सादर करावे लागेल.

५. एखाद्या विद्यार्थ्याने ह्या संस्थेत पदव्युत्तर परीक्षेसाठी एखाद्या विषयात प्रवेश घेतला आणि विद्यापीठाची परीक्षा दिली नाही किंवा तो अनुत्तीर्ण झाल्यावर तो दुस-यांदा प्रयत्नार्थी (रिपीटर) समजला जाईल व त्याला त्या विषयात तसेच इतर विषयात (एम. ए. भाग-१) साठी पुन्हा प्रवेश दिला जाणार नाही.

६. एका विषयात नियमित प्रवेश घेऊन पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर, दुस-या विषयात प्रवेश घेतेवेळी कुठलीही आर्थिक सवलत मिळणार नाही. त्याला शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

**४. शुल्क :**

१. विद्यार्थ्याला प्रवेश कोणत्याही तारखेला मिळाला किंवा त्याने संस्था केव्हाही सोडली तरी प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थ्याला संपूर्ण सत्राचे शुल्क भरावे लागेल.

२. या राज्यातील कोणत्याही महाविद्यालयातून सत्राच्यामध्ये स्थलांतर होऊन आलेल्या किंवा रा. तु. म. नागपूर विद्यापीठाच्या अध्यापन विभागातून आलेल्या विद्यार्थ्याला त्याचे नाव आधीच्या संस्थेत नोंदविलेले असेपर्यंतच्या मुदतीचे शुल्क भरावे लागणार नाही.

३. कोणत्याही कारणास्तव विद्यार्थ्याने सत्राच्यामध्ये संस्था सोडल्यास, त्याला शुल्काचा कोणताही भाग भरण्याबाबत फारच विशेष कारण असल्याशिवाय सूट देता येणार नाही.

४. शासनाच्या व विद्यापीठाच्या निर्देशाप्रमाणे शुल्काच्या आकारणीत बदल होऊ शकतो.

**४.१. शिक्षण शुल्कातील सवलती :**

(अ) **भाऊ आणि बहिणी** :—जर दोन किंवा अधिक भाऊ/बहिणी (या राज्याचे वास्तविक रहिवासी असलेले) एकाच वेळी संस्थेत शिकत असतील तर मोठ्या किंवा ज्येष्ठ विद्यार्थ्यांकडून पूर्ण शिक्षण शुल्क घेतले जाईल. त्यांच्या दुस-या किंवा इतर भावंडांकडून अर्धेच शिक्षण शुल्क घेतले जाईल. प्रवेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत भाऊ/बहीण सवलतीचा अर्ज सादर केला पाहिजे.

(ब) **आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी सवलत** :—नियमानुसार शुल्कमुक्तीची सवलत ज्यांनी मागितली त्यांच्या पालकांचे त्या आधीच्या आर्थिक वर्षातील वार्षिक उत्पन्न रु. १,००,००० चे वर नसावे. या संबंधीची सविस्तर नियमावली आणि सूचना १३ क्रमांकाच्या परिच्छेदात दिल्या आहेत.

(क) **प्राथमिक शाळा शिक्षक, माध्यमिक शाळा शिक्षक** :—ज्यांच्या मुला-मुलींना आधीच्या परीक्षेत ४५ टक्के गुण असल्यास, त्यांनाही शुल्कमुक्ती मिळू शकते. संस्थेत प्रवेश मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांनी सक्षम अधिका-याकडून प्रमाणित अर्ज करावा. अर्ज करतांना, **ज्यांना ही सवलत देण्यात आली त्यांना असे लिहून द्यावे लागेल की, (त्यांनी भरून दिलेले सवलत अर्ज नाकारले गेल्यास ते संपूर्ण शुल्क ताबडतोब भरतील.)** प्रवेश घेतेवेळी त्यांना शिक्षण शुल्क वगळून इतर सर्व शुल्क व ठेवी भराव्या लागतील.

(ड) **मागासवर्गीय विद्यार्थी** :—या राज्याचे वास्तविक रहिवासी असलेल्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क, वसतिगृहाचे भाडे, विद्यापीठ परीक्षा शुल्क भरण्यापासून सूट आणि प्रवेशासाठी जागांचे आरक्षण शासनाच्या नियमांप्रमाणे देण्यात येईल.

(इ) विद्यार्थी कल्याण योजनेअंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्याक विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध राहतील.

वरील कोणत्याही प्रकारच्या सवलतींसाठी केलेले अर्ज नामंजूर झाल्यास संपूर्ण शुल्क ताबडतोब भरावे लागेल.

**४.२.** संस्थेच्या कार्यालयात मिळणा-या विहित नमुन्यात अर्ज केल्यास तारणधन परत मिळू शकेल. मात्र, असा अर्ज संस्था सोडल्यापासून तीन वर्षांच्या आत केलाच पाहिजे. अन्यथा रक्कम परत मिळणार नाही.

**४.३.** ओळखपत्र हरविल्यास नवीन ओळखपत्राचे मूल्य रु. २५ व दंड रु. ५० असे एकूण रु. ७५ भरुन त्यासाठी छायाचित्रासहित अर्ज व त्यासोबत पैसे भरल्याची पावती जोडावी. तेव्हाच (डुप्लीकेट) ओळखपत्र दिले जाईल व तशी ओळखपत्रावर नोंद केली जाईल.

**४.४** संस्थेत प्रवेश घेऊ इच्छिणा-या विदेशातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाने वेळोवेळी निश्चित केलेले शुल्क भरावे लागेल.

**४.५. शिक्षण शुल्क परत करण्यासंबंधी तरतुदी :—**

**४.५.१. कनिष्ठ महाविद्यालय वर्ग :**

(अ) जर विद्यार्थ्याने प्रवेश घेतल्यानंतर १५ दिवसांचे आत संस्थेला लेखी कळविले की, कोणत्याही कारणास्तव तो या संस्थेत शिक्षण घेऊ शकत नाही व त्याला शुल्क परत घ्यावयाचे आहे, तर त्याने प्रवेशाचे वेळी भरलेले पूर्ण शुल्क, प्रवेश-शुल्क वजा करून त्याला परत केले जाईल.

(ब) जर विद्यार्थ्याला प्रवेश रद्द करावयाचा असेल व त्याने शुल्क परत घेण्यासाठी प्रवेश घेतल्यापासून १५ दिवसांची मुदत संपल्यानंतर अर्ज केला असेल तर त्या महिन्याच्या अखेरपर्यंतचे शिक्षण शुल्क संस्था परत करणार नाही. विद्यार्थ्याला सत्राच्या उरलेल्या अवधीचे शिक्षण शुल्क भरावे लागणार नाही.

**४.५.२. पदवी आणि पदव्युत्तर वर्ग :**

(अ) प्रवेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत संस्था सोडल्यास, पहिल्या महिन्याच्या शिक्षण शुल्काचा ५० टक्के भाग परत केला जाईल, मात्र, तसा लेखी अर्ज करावा लागेल.

(ब) प्रवेश मिळाल्यापासून १५ दिवसानंतर संस्था सोडल्यास, विद्यार्थ्याला संपूर्ण सत्राचे शिक्षण शुल्क भरावे लागेल.

## संस्थेत शैक्षणिक वर्षात " देय शुल्क " दाखविणारा तक्ता

| अ.क्र. | विवरण | ११ वी | १२ वी | बी. ए. १ ते ३ | एम. ए. १ व २ |
|---|---|---|---|---|---|
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १ | प्रवेश शुल्क | १८.०० | २०.०० | १५.०० | १५.०० |
| २ | शिक्षण शुल्क प्रथम (सत्र प्रवेश करते वेळी) | १२०.०० | १३६.०० | ५००.०० | ६००.०० |
| ३ | शिक्षण शुल्क द्वितीय सत्र (३१ डिसेंबर पूर्वी भरावे) | ९६.०० | १०४.०० | ३००.०० | ४००.०० |
| ४ | सत्र शुल्क | ३६.०० | ४०.०० | ७६०.०० | *७६०.०० |

Fee *w.e.f* 2013-2014 onwards

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Library Fee | 200 | 200 |
| 2. | Games-Sports & Gymkhana fee | 240 | 240 |
| 3. | Other Fee | | |
| | (i) Extra Curricular Activity | 80 | 80 |
| | (ii) Medical Exam. Fee | 40 | 40 |
| | (iii) Phycial Efficiency Test | 40 | 40 |
| | (iv) Student Aid fund | 60 | 60 |
| *4. | College Magazine Fee | 100 | 100 |
| | Total . . | 760 | *760 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रयोगशाळा शुल्क (घेतलेल्या प्रत्येक प्रात्यक्षिक विषयासाठी) कनिष्ठ महाविद्यालयात मात्र कितीही विषय असले तरी रुपये ७० च राहील. | ७०.०० | ७०.०० | ६००.०० | १०००.०० |
| *६ | प्रात्यक्षिक विषय घेणा-यांसाठी जास्तीचे तारणधन (घेतलेल्या प्रत्येक विषयासाठी) | १५.०० | १५.०० | २५.०० | २५.०० |
| ७ | ओळखपत्र मूल्य | २५.०० | २५.०० | २५.०० | २५.०० |
| ८ | इंटरनेट सुविधा शुल्क | . . | . . | २५.०० | २५.०० |
| ९ | क्रीडांगण देखभाल | २०.०० | २०.०० | २०.०० | २०.०० |
| १० | संस्थेची चाचणी शुल्क | ५०.०० | ५०.०० | ५०.०० | ५०.०० |
| ११ | स्नेहसंमेलन शुल्क | ३०.०० | ३०.०० | ३०.०० | ५०.०० |
| १२ | ग्रंथालय शुल्क | १०.०० | १०.०० | . . | . . |
| १३ | राष्ट्रीय सेवा योजना शुल्क | . . | . . | १०.०० | १०.०० |

* हा निधी वर्ष संपल्यानंतर विद्यार्थ्यांनी संबंधित विभागाकडून नादेय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर परत करण्यात येईल.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | विद्यापीठ शुल्क :— | | | | |
| | (अ) नोंदणी शुल्क | . . | . . | ११०.०० | ११०.०० |
| | (ब) इतर विद्यापीठातून येणा-यासाठी स्थलांतर शुल्क | . . | . . | २००.०० | २००.०० |
| | (क) विद्यापीठ वार्षिक शुल्क | . . | . . | १२५.०० | १२५.०० |
| | (ड) विद्यापीठ विद्यार्थी कल्याण शुल्क | . . | . . | ५.०० | ५.०० |
| | (इ) विद्यार्थी वैद्यकीय मदत निधी | . . | . . | ५.०० | ५.०० |
| | (ई) विद्यापीठ छात्रसंघ शुल्क | . . | . . | ५.०० | ५.०० |
| | (क) विद्यापीठ क्रीडा शुल्क | . . | . . | २५.०० | २५.०० |
| | (ख) वैद्यकीय तपासणी अर्ज | . . | . . | ५.०० | ५.०० |
| | (ग) वैद्यकीय तपासणी शुल्क | . . | . . | २०.०० | २०.०० |
| | (ह) विद्यापीठ मान्यता निधी (संलग्नीकरण शुल्क) | . . | . . | ५.०० | १०.०० |
| | (ज) विद्यार्थी साहाय्य निधी | . . | . . | ५.०० | ५.०० |
| | (य) आंतर विद्यापीठ क्रीडा व सांस्कृतिक कार्य शुल्क | . . | . . | २०.०० | २०.०० |
| | (र) अश्वमेध शुल्क | . . | . . | ३०.०० | ३०.०० |
| | (ल) ई-सेवा शुल्क | . . | ५०.०० | ५०.०० | . . |
| | (व) डिझास्टर मॅनेजमेंट शुल्क | . . | . . | १०.०० | १०.०० |
| | (श) पर्यावरण शुल्क (बी. ए.-२ करिता) | . . | . . | १००.०० | . . |

**टीप** :–(१) आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय सवलत (ई.बी.सी.) प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क सोडून इतर सर्व शुल्क द्यावे लागेल. ही सवलत केवळ प्रथम व द्वितीय पाल्यास मिळेल. तिस-या पाल्यास ई.बी.सी. सवलत मिळणार नाही.

(२) अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना फक्त ओळखपत्रांचे मूल्याशिवाय इतर आवश्यक शुल्क द्यावे लागेल.

(३) परदेशातून येणा-या विद्यार्थ्यांना दोन्ही सत्राचे शिक्षण शुल्क एकाच हप्त्यात व तेही प्रवेश घेतेवेळीच द्यावे लागेल.

(४) शासन निर्णय क्र. एएफई-१०८४-(२५६८)-साशि-५, दिनांक १२ जून १९८५ अनुसार कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींना कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जाणार नाही. फक्त ओळखपत्र मूल्य लागेल.

(५) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या पाल्यांना शिक्षण विनाशुल्क करण्याबाबत शासन निर्णयानुसार (क्र. ईबीसी-१०८८-२१-इ-साशि, दिनांक २१ जून १९९५) शिक्षण शुल्क द्यावे लागणार नाही. इतर सर्व शुल्क द्यावे लागेल.

(६) द्वितीय सत्रात भरावयाचे शुल्क वेळेवर न भरल्यास, दंड रु. ५० भरावा लागेल.

(७) विद्यार्थ्याने विद्यापीठाची परीक्षा न दिल्यास संपूर्ण वर्षाचे शुल्क भरावे लागेल.

(८) आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय सवलत प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांना सवलत घेतली असल्यास ई.बी.सी. सवलतीचा अर्ज प्रवेश घेतेवेळी भरुन द्यावा लागेल.

(९) अपंग विद्यार्थ्यांना शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे शुल्क आकारले जाईल.

(१०) शासन निर्णय क्र. ईबीसी २००३ पत्र क्र. ३०१/मावक-२, दि. १ नोव्हेंबर २००३ नुसार व्यावसायिक पाठ्यक्रम पूर्ण करून अव्यावसायिक पाठ्यक्रमास प्रवेश घेतल्यास त्यास शिष्यवृत्ती मिळणार नाही.

## ५. वसतिगृह :

मुलांचे एक व मुलींचे एक वसतिगृह संस्थेतर्फे चालविले जाते. दोन्ही वसतिगृहे संस्थेच्या जुन्या परिसरात आहेत. संस्थेचे शैक्षणिक वर्ष सुरू होताच वसतिगृहे उघडली जातात व वर्ष संपताच ती बंद होतात. सुट्टीच्या काळात ती बंद असतात. वसतिगृहात प्रवेशासंबंधी सूचना खालीलप्रमाणे आहेत.—

### ५.१. प्रवेश :—

(अ) विहित नमुन्यातील अर्ज आणि अन्य माहिती मुलांच्या वसतिगृहाचे अधीक्षक व मुलींच्या वसतिगृहाच्या अधीक्षिका ह्यांचेकडे मिळेल.

(ब) वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी संस्थेत प्रवेश घेताच त्वरित अधीक्षक/अधीक्षिका यांच्याशी संपर्क साधावा.

(क) वसतिगृहात प्रवेश मिळविण्याकरिता विहित केलेल्या नमुन्यातच अर्ज केला पाहिजे. हा अर्ज वसतिगृहाच्या कार्यालयात मागणी केल्यास रु. २ शुल्क भरून मिळू शकेल.

(ड) संस्थेतील प्रवेशाच्या आधारे वसतिगृहात प्रवेश दिला जाईल.

(इ) वसतिगृहात फक्त एकाच शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश देण्यात येतो. पुनःप्रवेशाकरिता प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस नवा अर्ज निकाल लागल्यापासून १० दिवसांच्या आत करावा लागेल.

(फ) वसतिगृहाच्या नियमांचा व शिस्तीचा भंग केल्यास, विद्यार्थ्यास केव्हाही वसतिगृहातून काढून टाकण्यात येईल.

(ग) वसतिगृहात प्रवेश घेतल्याच्या तारखेनंतर एक महिन्याच्या आत वसतिगृहात दाखल झाले पाहिजे. अन्यथा प्रवेश रद्द केला जाईल. तसेच प्रवेश घेतल्यापासून सर्व शुल्क लागू होतील.

(ह) वसतिगृहात दाखल झाल्यानंतर अधीक्षकांच्या/व्यवस्थापिकेच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही विद्यार्थी/कोणतीही विद्यार्थींनी सतत तीन दिवस गैरहजर राहिल्यास, त्याला/तिला वसतिगृहातून काढून टाकण्यात येईल.

(ळ) वसतिगृहात प्रवेश घेण्यासाठी खालील कागदपत्रांची आवश्यकता आहे.—

१. संस्थेत प्रवेश घेतल्याची पावती. (छायांकित प्रत)

२. संस्थेत प्रवेशित विद्यार्थ्यांचा व पालकांचा पासपोर्ट साईज फोटो १ प्रत.

(अ) आईवडील हयात नसल्यास बहीण, भाऊ किंवा पालकत्व ज्यांनी स्वीकारलेले आहे त्यांचे फोटो व ओळखपत्र. (उदा. पॅनकार्ड, आधार कार्ड/संपर्क क्रमांक)

३. जातीचे प्रमाणपत्र व रहिवासी प्रमाणपत्र अनिवार्य.

४. वैद्यकीय प्रमाणपत्र (निरोगी अथवा आजार असल्यास त्याविषयक वैद्यकीय पत्र).

५. वसतिगृह प्रवेशासाठी पालकांची उपस्थिती अनिवार्य. प्रवेशानंतर पालकांनी अधीक्षकासमोर हमीपत्र भरावे.

६. कोणत्याही वर्षाकरिता केवळ एकदाच प्रवेश मिळेल.

प्रत्येक सत्राप्रारंभी (जुलै/ऑगस्ट) आणि सत्राअखेर (ऑक्टो./नोव्हेंबर) तसेच (नोव्हेंबर/डिसेंबर) (मार्च/एप्रिल) या दोन्हीही सत्रात होणा-या संयुक्त सभेला पालकांनी उपस्थित रहाणे अनिवार्य आहे.

**५.२. वसतिगृह शुल्क परत करण्यासंबंधीच्या तरतुदी :—**

(अ) एकदा वसतिगृहात प्रवेश घेतल्यानंतर, वसतिगृह सोडल्यास विद्यार्थ्याला कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही.

(ब) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण सेवायोजन विभाग, शासन निर्णय क्र. जीसीएच/१०९२-(९९)/विशि-५, दिनांक २ जून १९९२ च्या अन्वये वसतिगृहाच्या शुल्काचे दर निर्धारित करण्यात आले आहेत. तथापि, शासनाने वसतिगृहाच्या शुल्कात वाढ केल्यास, ती विद्यार्थ्यास बंधनकारक राहील.

(क) वसतिगृहात प्रवेश मिळाल्याबरोबर प्रत्येक विद्यार्थ्याला निर्धारित केलेले शुल्क, वर्गण्या, खोलीभाडे व अनामत रक्कम संस्थेच्या कार्यालयात भरावे लागेल.

**५.३. सर्वसाधारण नियम :—**

(१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय विद्यार्थी तसेच आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना वसतिगृहाचे खोलीभाडे भरण्यापासून शासनाच्या नियमाप्रमाणे सूट देण्यात येईल.

(अ) विद्यार्थ्यांची मागणी असल्यास व पुरेशी विद्यार्थी संख्या असल्यास, मेसची व्यवस्था केली जाईल.

(ब) विद्यार्थिनी वसतिगृहाकरिता मेस अनिवार्य राहील.

(२) वसतिगृहात राहणा-या प्रत्येक विद्यार्थ्याला वसतिगृहातील भोजनगृहातच जेवण घेणे अनिवार्य राहील. तसेच भोजनखर्च प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला आगाऊ द्यावा लागेल.

(३) भोजनखर्च विद्यार्थ्यांना स्वतःच द्यावा लागेल व भोजनगृहाच्या कंत्राटदाराकडे जमा करावा लागेल. तसे न केल्यास पुढील प्रत्येक दिवशी रु. १० प्रमाणे दंड आकारला जाईल.

(४) विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारावर वसतिगृहात प्रवेश दिला जाईल. महाविद्यालयात प्रवेश मिळाला म्हणजे वसतिगृहात प्रवेश दिलाच पाहिजे असे नाही.

(५) अनुत्तीर्ण/ए.टी.के.टी. असलेल्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश मिळणार नाही.

(६) वसतिगृहाच्या खोल्यांमध्ये आवश्यक विजेचे बल्ब/ट्युबलाईटची व्यवस्था असते. विद्यार्थ्यांनी आपल्या खोलीतील बल्ब/ट्युबलाईट खराब केल्यास ते बदलून दिले जाणार नाहीत. तो खर्च विद्यार्थ्यांना स्वतःच करावा लागेल.

(७) विद्यार्थ्यांने ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेला असेल त्याची परीक्षा संपल्यानंतर दोन दिवसांच्या आत त्याला वसतिगृहाची खोली सोडावी लागेल.

(८) वसतिगृहात राहात असताना विद्यार्थ्यांनी कुठल्याही मौल्यवान वस्तू जवळ बाळगू नयेत. बाळगल्यास, त्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यार्थ्यांची राहील.

(९) वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकरिता आवश्यक ते फर्निचर, वैद्यकीय मदत, पाणीपुरवठा, झाडलोट इ. व्यवस्था असते. प्रत्येक विद्यार्थ्यांने वसतिगृहाच्या स्वच्छतेकडे वैयक्तिक लक्ष देणे अनिवार्य आहे. वसतिगृहात कचरा करू नये, अन्यथा ते शिक्षेस पात्र होतील.

(१०) विद्यार्थ्यांना स्वतःची मच्छरदाणी, गादी, ब्लँकेट, टिफिन, लहान बादली, बिछाना व कुलूप इ. आणावे लागेल.

(११) रात्री सात नंतर योग्य अधिका-यांच्या परवानगीशिवाय विद्यार्थी / विद्यार्थीनी वसतिगृहाच्या बाहेर जाता कामा नये. अत्यावश्यक कामाव्यतिरिक्त उशीर झाल्यास रु. २०/- दंड आकारण्यात येईल. वसतिगृहाच्या परिसरातील सामान, दारे व खिडक्यांची तावदाने इ. सरकारी मालाची नासधूस झाली वा ते हरवले तर त्यांची संयुक्त व वैयक्तिक जबाबदारी वसतिगृहात राहणा-या प्रत्येकावर राहील.

(१२) सोय केलेल्या विजेच्या दिव्याखेरीज अधिक दिवे लावणे, विजेच्या उपकरणात काढघाल करणे अगर विजेची शेगडी, इस्तरी वापरणे यांना सक्त मनाई आहे. या नियमांचे उल्लंघन करणा-यास जबर दंड आकारण्यात येईल.

(१३) वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्याने आई / वडील / पालक यांना आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रवेश निश्चित केला जाणार नाही.

(१४) वसतिगृहात गैरहजर राहावयाचे असल्यास, विद्यार्थ्यांनी अधीक्षक / अधीक्षिका यांच्याकडे लेखी अर्ज केला पाहिजे.

(१५) संस्था सुरू असेल त्यादिवशी विद्यार्थ्यांना पूर्वपरवानगीशिवाय नागपूर सोडून जाता येणार नाही.

(१६) आजारी पडल्यास विद्यार्थ्यांनी अधीक्षक / अधीक्षिकेस ताबडतोब कळविले पाहिजे. स्वतःच्या जबाबदारीवर त्यांना बाहेरच्या डॉक्टरांकडून औषधोपचार करून घेता येईल. तथापि, याबाबतची पूर्वसूचना (लेखी) अधीक्षक / अधीक्षिकेस देणे आवश्यक आहे.

(१७) विद्यार्थ्यांना आई किंवा वडील किंवा पालक यांची सही असलेली मान्यताप्राप्त व्यक्तीची नावे वसतिगृहात प्रवेश घेतांना द्यावी लागेल. या यादीतील व्यक्तींनाच वसतिगृहातील विद्यार्थ्यांना ठराविक वेळेत भेटता येईल किंवा प्रसंग विशेषी त्यांचेकडेच गावात राहण्याची परवानगी मिळू शकेल. अशा प्रकाराच्या यादीच्या अभावी विद्यार्थ्याला वसतिगृहात कोणालाही भेटता येणार नाही किंवा गावात कोणाकडेही जाऊन राहता येणार नाही.

(अ) कोणत्याही विद्यार्थ्यांना गावातील आपल्या पालक / नातेवाईकांकडे राहावयास जावयाचे असेल तर त्या नातेवाईकाने स्वतःच्या जबाबदारीवर विद्यार्थ्यांना आपल्याकडे घेऊन जावे आणि स्वतः आपल्या बरोबरच त्याला / तिला वसतिगृहात पोहचवून द्यावे.

(ब) परगावी आपल्या आई / वडील / पालकाकडे राहावयास गेलेल्या विद्यार्थ्याने वसतिगृहात परत येते वेळी आपल्या आई / वडील / पालकांचे पत्र घेऊन येणे आवश्यक आहे.

(१८) पालकांना लेखी सूचना दिल्यानंतर त्यांनी त्याची दखल घेऊन या संदर्भात अधीक्षक किंवा अधीक्षिका यांना त्वरीत भेटणे आवश्यक आहे. याबाबतीत त्यांच्याकडून निष्काळजीपणा झाल्यास, होणा-या परिणामांची संपूर्ण जबाबदारी पालकांवरच राहील.

(१९) याखेरीज इतर नियम करणे अधिका-यांच्या अधीन आहे. ते सर्व विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

(२०) रॅगिंग करणे हा गुन्हा आहे. तसे आढळल्यास संबंधित विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल.

(२१) वसतिगृहात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या खोलीत आगंतुक व्यक्ती रात्री मुक्कामासाठी आढळून आल्यास, त्या विद्यार्थ्यांचा वसतिगृहातील प्रवेश कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द केला जाईल.

(२२) संस्थेतील प्रवेश रद्द केल्यास वसतिगृहाचा प्रवेश रद्द होईल.

(२३) विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सामानाची / पैशाची जबाबदारी स्वतः घ्यावी. पैसे चोरी गेल्यास त्याची जबाबदारी विद्यार्थ्यांचीच राहील. कार्यालयाशी त्याचा संबंध येणार नाही.

(२४) वसतिगृहात कोणतेही उपक्रम करावयाचे असल्यास, अधीक्षक व संचालक यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

(२५) वसतिगृहामध्ये प्रवेशाबाबत अंतिम निर्णय संचालक, व.ना.शा.क. व स.वि.संस्था, नागपूर यांचा राहील.

**वसतिगृह शुल्क तक्ता**

| | रुपये |
|---|---|
| वसतिगृह प्रवेश फॉर्म शुल्क | ००२.०० |
| वसतिगृह खोलीभाडे | १०००.०० |
| वसतिगृहाचा वीज आकार | ७५०.०० |
| वसतिगृहाचा पाणी आकार | २५०.०० |
| रिडींगरूम शुल्क | १०.०० |
| वसतिगृह ओळखपत्र शुल्क | १०.०० |
| तारणधन | ४८०.०० |
| एकूण . . | २५०२.०० |

**६. ग्रंथालय व त्याचे नियम :**

(१) संशोधन करणा-या विद्यार्थ्यांना एकावेळी जास्तीत जास्त पाच, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना तीन आणि पदवीपूर्व विद्यार्थ्यांना दोन पुस्तके मिळतील.

(२) संस्थेचे ग्रंथालय सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते ५.४५ पर्यंत उघडे राहील. यातील बदल वेळोवेळी जाहीर केले जातील.

(३) छापील मागणीपत्रकांत मागणी केल्याशिवाय ग्रंथ दिले जाणार नाहीत. आपले मागणीपत्र पुस्तके मिळण्यासाठी निर्धारित केलेल्या दिवसापूर्वी एक दिवस आधी पेटीत टाकावे.

(४) पुस्तके निर्धारित मुदतीच्या आत परत करणे बंधनकारक आहे. अन्यथा नियमानुसार दंड भरावा लागेल.

(५) पुस्तक हरविल्यास त्वरित ग्रंथालय-लिपिकाच्या निदर्शनास आणावे. पुस्तक हरवल्याची सूचना दिलेल्या दिवसापासून दोन आठवड्याचा अवधी बदली पुस्तक आणून देण्यासाठी दिला जाईल. या अवधीत दंड होणार नाही. हरवलेले पुस्तक दोन आठवड्यात आणून न दिल्यास पुस्तकाच्या किंमतीच्या दुप्पट रक्कम भरावी लागेल. हरवलेले पुस्तक दुर्मिळ किंवा महत्वाचे असल्यास, संचालक ठरवतील त्याप्रमाणे अतिरिक्त दंड भरावा लागेल.

(६) प्रत्येक विद्यार्थ्याला एक ग्रंथालय-पत्रिका देण्यात येईल. पत्रिकेशिवाय ग्रंथ मिळणार नाहीत अथवा परतही घेतले जाणार नाही. मूळ ग्रंथालय-पत्रिका हरवल्यास १५ रुपये भरून दुसरी पत्रिका प्राप्त करता येईल.

(७) पुस्तक घेताना प्रत्येक विद्यार्थ्याने ग्रंथालय-पत्रिकेतील पहिले तीन स्तंभ भरले पाहिजेत व त्यावर स्वाक्षरी केली पाहिजे. पुस्तके परत करताना ग्रंथालय-लिपिकाला ती स्वतः सादर करून संबंधित नोंदीवर योग्य ती स्वाक्षरी घ्यावी.

(८) संदर्भ विभागातील पुस्तके, "ग्रंथालयाबाहेर नेण्यासाठी नाही" असा शिक्का असलेली पुस्तके ग्रंथालयाबाहेर नेता येणार नाहीत. वाचून झाल्यावर पुस्तके ग्रंथालय-लिपिकाच्या स्वाधीन करावी.

(९) पुस्तकाची कशाही प्रकारची हानी झाल्यास, त्याकरिता पुस्तक नेणारा जबाबदार राहील.

(१०) पुस्तक विद्रूप अवस्थेत परत आणल्यास त्याची जबाबदारी पुस्तक नेणा-यावरच राहील. त्यात अधिक चौकशीची गरज असणार नाही. पुस्तके चांगल्या अवस्थेत आहेत हे पाहूनच घेणा-याने ती न्यावीत. ती तशी नसतील तर ही बाब ग्रंथालय-लिपिकाच्या निदर्शनास आणून तसा उल्लेख पत्रिकेत करून घ्यावा.

(११) ग्रंथालयासंबंधी कोणतीही तक्रार, सूचना किंवा विनंती ग्रंथपालांकडे करावी किंवा सूचना पेटीत टाकावी.

(१२) वाचनकक्षात प्रवेश करतेवेळी किंवा ग्रंथालयातून पुस्तके नेताना विद्यार्थ्यांनी आपले ओळखपत्र सादर करावे.

(१३) विद्यापीठ-परीक्षेचे प्रवेशपत्र विद्यार्थ्यांस दिल्यानंतर त्याला ग्रंथालयातून घरी नेण्यासाठी पुस्तके मिळणार नाहीत.

(१४) संस्थेत इंटरनेट सुविधांचा लाभ घेण्याकरिता विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची सदस्यता घेणे अनिवार्य आहे.

**७. ११ वा वर्ग उत्तीर्ण होण्याबाबत नियम :**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे–४११ ०१० यांचे परिपत्रक क्र. एसबी/बीआर/हाय.सेकं/६, दिनांक १५ जुलै, १९८२ प्रमाणे :–

(१) 'आवश्यक भाषा' या विषयात किमान ३५ टक्के व दुसरी भाषा या विषयातील मिळालेले गुण मिळून सरासरी ३५ टक्के व्हावयास पाहिजे. इतर सर्व विषयात उत्तीर्ण होण्यासाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक आहेत.

(२) ज्या विषयात लेखी परीक्षा व प्रयोग अशी विभागणी आहे तेथे दोन्ही मिळून होणारी टक्केवारी उत्तीर्ण होण्यासाठी अथवा प्रावीण्य ठरविण्यासाठी विचारात घेतली जाईल.

(३) जो विद्यार्थी एकाच वेळी सर्व विषयातील परीक्षा देत आहे आणि जो एका किंवा अधिक विषयात अनुत्तीर्ण आहे, त्याची एका/अधिक विषयातील एकूण त्रुटी ३० टक्के गुणांपर्यंत क्षम्य समजता येईल. मात्र कोणत्याही एका विषयातील त्रुटी १० गुणांपेक्षा जास्त असू नये.

(४) एखाद्या विषयातील त्रुटी १० गुण जादा देऊन क्षम्य करता येत असली तरी असा लाभ त्या विषयात उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली ३५ टक्के ही मर्यादा गाठेपर्यंतच देता येईल.

(५) ए. टी. के. टी. ची सवलत दिली जाणार नाही.

(६) संबंधित विषयातील सर्व नेमलेली प्रायोगिक कार्ये विद्यार्थ्याने पूर्ण केलेली असली पाहिजेत.

(७) कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रथम वर्षाच्या (११ वी) विद्यार्थ्यांचा निकाल फक्त वार्षिक परीक्षेत मिळविलेल्या गुणांवरून न ठरविता खालील पद्धतीने ठरविला जाईल.—

| | | |
|---|---|---|
| (क) घटक चाचण्या व गृहपाठ | . . | ५० गुण |
| (ख) प्रथम सत्रांत परीक्षा | . . | ५० गुण |
| (ग) द्वितीय सत्रांत परीक्षा | . . | १०० गुण |

यांच्या गुणांची सरासरी काढून अंतिम निकाल तयार केला जाईल. सर्व गृहपाठ व घटक चाचण्या तसेच द्वितीय सत्रांत (वार्षिक) परीक्षा ह्यांना उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

(८) क्षमापन नियमानुसार लाभ देऊन देखील जर विद्यार्थी उत्तीर्ण होत नसेल तर वरच्या वर्गात जाण्यास तो पात्र ठरणार नाही.

**७.१. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी गणवेश :**

**मुलांकरिता :–** निळी जीन्स पँट आणि पांढरा शर्ट.

**मुलींकरिता :–** निळी जीन्स पँट/निळी सलवार आणि पांढरी कुर्ती.

## ८. अभ्यासक्रमाचे विषय

### ८.१. कनिष्ठ महाविद्यालय

XI व XII माध्यम - मराठी / हिंदी

**विषय** : XI

(१) राज्यशास्त्र/संगीत-१/इतिहास

(२) भूगोल/आहारशास्त्र/गृहव्यवस्थापन

(३) समाजशास्त्र/तर्कशास्त्र/पाली

(४) अर्थशास्त्र/मानसशास्त्र/संगीत-२

**विषय** : XII

(१) राज्य/इतिहास/संगीत-१

(२) भूगोल/बालविकास/वस्त्रशास्त्र

(३) समाजशास्त्र/तर्कशास्त्र/पाली

(४) अर्थशास्त्र/मानसशास्त्र/संगीत-२

(**नोट**–मुलांना आहार, वस्त्र, गृहव्यवस्थापन, बालविकास हे विषय घेता येतील.)

**अध्यापन माध्यम** : मराठी/हिंदी

### ८.२. त्रैवर्षीय पदवी अभ्यासक्रम (वाङ्‌मय स्नातक)

बी. ए. भाग १, बी. ए. भाग २, बी. ए. (अंत्य)

अध्यापन माध्यम - मराठी/हिंदी

बी. ए. प्रथम–राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार विद्यार्थ्यांना एक प्रमुख विषय व एक दुय्यम विषय घ्यावा लागेल.

(B.A.-1 चे प्रवेश NEP नुसार विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केले जातील.)

बी. ए. द्वितीय

गट (१) - आवश्यक इंग्रजी

गट (२) - आवश्यक भाषांपैकी कोणतीही एक :-

मराठी / हिंदी / उर्दू / संस्कृत / फार्सी / अरेबिक / पाली / Supplementary English

**टीप**.—पुढील गट (३) ते गट (७) यापैकी कोणत्याही चार गटातून प्रत्येकी एक विषय घेता येईल.

गट (३) - खालील आधुनिक व प्राचीन साहित्यापैकी कोणतेही एक :–

मराठी साहित्य/हिंदी साहित्य/इंग्रजी साहित्य/उर्दू साहित्य/पाली साहित्य/संस्कृत साहित्य/पर्शियन साहित्य/अरेबिक साहित्य.

**टीप**.—संस्कृत साहित्य/पाली साहित्य/पर्शियन साहित्य व अरेबिक साहित्य घेणा-या विद्यार्थ्यांना गट ३ मधून अतिरिक्त एक साहित्य घेता येईल.

गट (४) - मानव्यविद्याशास्त्र यापैकी कोणतेही एक :-

समाजशास्त्र/प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व.

गट (५) - मानव्यविद्याशास्त्र यापैकी कोणतेही एक :-

राज्यशास्त्र/इतिहास

गट (६) - अर्थशास्त्र/तत्त्वज्ञान

गट (७) - प्रात्यक्षिक विषयांपैकी एक :-

भूगोल/गृहअर्थशास्त्र/मानसशास्त्र/संगीत

**टीप.**—(NSS, NCC, स्काउट गाईड व क्रीडा या विषयात विद्यार्थ्यांचा समावेश असणे आवश्यक आहे.)

बी. ए. तृतीय

गट (१) - आवश्यक इंग्रजी

गट (२) - आवश्यक भाषांपैकी कोणतीही एक :-

मराठी / हिंदी / उर्दू / संस्कृत / फार्सी / अरेबिक / पाली / Supplementary English

**टीप.**—पुढील गट (३) ते गट (६) यापैकी कोणत्याही चार गटातून प्रत्येकी एक विषय घेता येईल.

गट (३) - खालील आधुनिक व प्राचीन साहित्यापैकी कोणतेही एक :—

मराठी साहित्य/हिंदी साहित्य/इंग्रजी साहित्य/उर्दू साहित्य/पाली साहित्य/संस्कृत साहित्य/ पर्शियन साहित्य/अरेबिक साहित्य.

**टीप.**—संस्कृत साहित्य/पाली साहित्य/पर्शियन साहित्य व अरेबिक साहित्य घेणा-या विद्यार्थ्यांना गट ३ मधून अतिरिक्त एक साहित्य घेता येईल.

गट (४) - मानव्यविद्याशास्त्र यापैकी कोणतेही एक :-

अर्थशास्त्र/समाजशास्त्र/प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्व.

गट (५) - मानव्यविद्याशास्त्र यापैकी कोणतेही एक :-

राज्यशास्त्र/इतिहास/तत्त्वज्ञान

गट (६) - प्रात्यक्षिक विषयांपैकी एक :-

भूगोल/गृहअर्थशास्त्र/मानसशास्त्र/संगीत

**टीप.**—(NSS, NCC, स्काउट गाईड व क्रीडा या विषयात विद्यार्थ्यांचा समावेश असणे आवश्यक आहे.)

**अध्यापन माध्यम :** मराठी / हिंदी

**टीप :** (१) बी. ए. तृतीय वर्षासाठी सेमिस्टर पद्धतीच्या विद्यापीठ नियमानुसार प्रवेश होतील.

(२) पर्यावरणशास्त्र फक्त बी. ए. भाग-२ करिता अनिवार्य.

(३) बी. ए. भाग-२ करिता पर्यावरण विषयात गृहपरीक्षा राहील. या परीक्षेत विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. विद्यापीठाचे परिपत्रक क्रमांक ०२/Aed. १४३७, दिनांक २७ फेब्रुवारी, २००८ अन्वये पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रम उत्तीर्ण न झाल्यास विद्यापीठाकडून पदवी मिळणार नाही.

(४) एकदा निवडलेले विषय कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाहीत.

(५) गृहअर्थशास्त्र विषयात मुलांनादेखील प्रवेश देण्यात येईल.

(६) प्रत्येक विषयाकरिता मर्यादित जागा असल्यामुळे गुणवत्ता यादीनुसार मर्यादित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल.

(७) एखाद्या ऐच्छिक विषयात एखाद्या माध्यमात किमान १५ विद्यार्थी असल्यास ते माध्यम सुरू राहीलच असे नाही.

(८) विषय बदलण्यासंबंधीचे अंतिम निर्णय मा. संचालक घेतील.

**८.३. द्विवार्षिक पदव्युत्तर अभ्यासक्रम (वाङ्मय पारंगत)**

अध्यापन माध्यम : **मराठी**

संस्थेत एम. ए. साठी खालील विषयात अध्ययनाची सोय उपलब्ध आहे.—

| | |
|---|---|
| (१) मराठी | (२) इंग्रजी |
| (३) उर्दू | (४) फारसी |
| (५) अरबी | (६) संस्कृत |
| (७) अर्थशास्त्र | (८) इतिहास |
| (९) राज्यशास्त्र | (१०) तत्त्वज्ञान |
| (११) भूगोल | (१२) भारतीय संगीत |
| (१३) गृह अर्थशास्त्र | |

**९. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, पुरस्कृत पीएच.डी. संशोधन केंद्र :—**

वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्थेला रातुम नागपूर विद्यापीठाचे पत्र क्रमांक RTMNU/CDS/2021/4185, दिनांक १८-१०-२०२१ द्वारे संशोधन केंद्राची मान्यता प्राप्त झालेली असून येथे खालील दिलेल्या विषयात आचार्य पदवीसाठी प्रत्येकी २० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

(१) इंग्रजी, (२) मराठी, (३) उर्दू, (४) राज्यशास्त्र, (५) तत्त्वज्ञान, (६) भूगोल, (७) संगीत, (८) गृह अर्थशास्त्र,

**संशोधन करणा-या विद्यार्थ्याने सुरुवातीस ही रक्कम भरावी. (अहस्तांतरणीय)**

या व्यतिरिक्त मानसशास्त्र, अर्थशास्त्र, पाली, हिंदी, या विषयात या संस्थेतील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या संशोधन केंद्रात विद्यार्थी संशोधन करू शकतात.

**फी ची आखणी पुढील प्रमाणे.—**

**Part : A**—Fees to be paid by the student to RTMNU

| Sr. No. | Particulars | Amount |
|---|---|---|
| 1 | Ph. D. Research Registration Fee (Fee for Submission of Synopsis) | Rs. 2,500/- |
| 2 | Ph. D. Research Retention Fee (Every Six Monthly) | Rs. 600/- |
| 3 | Ph. D. Research Thesis Submission Fee | Rs. 12,000/- |
| 4 | Application Fee for Recognition as Supervisor for Ph. D. | Rs. 5,000/- |

**Part : B**—Fees to be paid by the student to the Concerned Research Center.

| Sr. No. | Particulars of Fee | Fee for University Departments, Conducted Colleges and Affiliated grant in aid Colleges | Fee for Self Financed college |
|---|---|---|---|
| 1 | Admission Fee (one time) | Rs. 2,000/- | Rs. 2,000/- |
| 2 | **Annual Ph. D. Program Fee** | | |
| (a) | Faculty of Science and Technology (Science Subjects) | Rs. 6,000/- | Rs. 7,000/- |
| (b) | Faculty of Science and Technology (Engineering & Tech., Arehitecture & Phsrmacy Subjects) | Rs. 12,000/- | Rs. 19,000/- |
| (c) | Faculty of Humanities, Commerce & Management and Interdisciplinary Studies | Rs. 5,000/- | Rs. 6,000/- |
| 3 | Annual Laboratory Fee, if applicable | Rs. 6,000/- | Rs. 12,000/- |
| 4 | Annual Library Fee | Rs. 2,000/- | Rs. 4,000/- |

In addition to the above, a student will be required to pay a fee of Rs. 7000 to RTMNU if he/she desires to Pursue ‘Coursework’ Conducted by UGC - HRDC at RTMNU.

**१०. फेलोशिप्स आणि शिष्यवृत्त्या :**

पात्र विद्यार्थ्यांना काही छात्र निर्वाहवृत्त्या (Stipend) शिष्यवृत्त्या देण्यात येतात. अशा सवलती घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांनी तपशीलासाठी कार्यालयात संपर्क साधावा.

**विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या—**

पूर्वाश्रमीच्या अनुसूचित जातीतून नवबौद्ध झालेले विद्यार्थी, अनुसूचित जाती/जमातीतील विद्यार्थी आणि इतर मागासवर्गीय जातीतील विद्यार्थी ह्यांना भारत सरकारच्या शिष्यवृत्ती मिळतील.

**भारत सरकार शिष्यवृत्त्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळण्याबाबत नियम व राजश्री शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेकरिता नियम—**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (अनुसूचित जाती/जमाती/नवबौद्ध, भटक्या जाती, विमुक्त जमाती आणि विदर्भातील विशिष्ट परिसराबाहेरील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना) शालान्त परीक्षेनंतर मिळणा-या भारत सरकारच्या शिष्यवृत्त्यांची योजना, महाराष्ट्र राज्याच्या समाजकल्याण खात्यामार्फत अंमलात येते. शालान्त परीक्षेनंतरचे (लोअर) शिक्षण घेणारे सर्व मागासवर्गीय विद्यार्थी भारत सरकारच्या या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असतात. ह्या संबंधीचे नियम शासनातर्फे वेळोवेळी प्रसिद्ध केले जातात.

(अ) सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/निःशुल्क शिक्षण सवलतीचा अर्ज करणे आवश्यक आहे, अथवा संपूर्ण शिक्षण शुल्क भरावे लागेल.

(ब) प्रवेश घेतल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत शासनाच्या सूचनेनुसार Online " mahadbtmahait.gov.in " या पोर्टलवरून अर्ज भरणे आवश्यक आहे.

(क) मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी व तसेच ज्या इतर मागासवर्गीयांकरिता पालकाचे उत्पन्न रु. G.R. पेक्षा जास्त असेल त्यांनी फ्री-शिपकरिता अर्ज भरावा.

(ड) बाहेर राज्यातून आलेल्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र शासनाचे जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा पूर्ण शुल्क भरावे लागेल.

**भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावयाची पद्धत—**

सर्व मागासवर्गीय अल्प-उत्पन्न गटात येणारे विद्यार्थी विहित नमुन्यात वरील शिष्यवृत्तींसाठी अर्ज करू शकतात. हे अर्ज ह्या संस्थेमार्फत करावेत. अर्ज सूचित केलेल्या मुदतीच्या आत काळजीपूर्वक करावेत, कारण काही त्रुटी किंवा चुकीची माहिती तसेच असत्य माहिती असल्यास ते वरील शिष्यवृत्तीस अपात्र ठरविले जाऊ शकतील. ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडला असेल ते वरील शिष्यवृत्तीस अपात्र ठरविले जाऊ शकतील. ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडला असेल त्यांना न्यायालयात प्रतिज्ञापत्र करून खंड पडण्याच्या कालावधीत काय करीत होते याचा खुलासा करणे आवश्यक आहे. (गॅप सर्टिफिकेट जोडणे)

जे विद्यार्थी गतवर्षी भारत सरकारची शिष्यवृत्ती घेत होते आणि जे वार्षिक परीक्षेत उत्तीर्ण झाले त्यांनी नूतनीकरणासाठी अर्ज करावेत. शिष्यवृत्ती मंजुरीबाबतची प्रकरणे संस्थेकडून विशेष समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग तसेच प्रकल्प अधिकारी, आदिवासी विभाग यांचेकडे पाठविली जातील.

**शिष्यवृत्ती अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडण्यात यावी—**

(१) सक्षम अधिका-यांच्या स्वाक्षरीचे जातीचे प्रमाणपत्र.

(२) उत्पन्नाचा दाखला मूळप्रत (तहसीलदार यांच्या स्वाक्षरीचा).

(३) आई वडील नसल्यास मृत्यूचा दाखला.

(४) शिक्षणात खंड पडला असेल तर खंड प्रमाणपत्र (गॅप सर्टीफिकेट) (मूळप्रत).

(५) बाहेरच्या जिल्ह्यातून शिक्षण घेऊन आला असेल तर जिल्हाबदली प्रमाणपत्र मूळप्रतीत जोडावे.

(६) टी. सी. व गुणपत्रिका छायाप्रत.

(७) विद्यार्थी वसतिगृहात राहत असल्यास प्रमाणपत्र सादर करावे.

(८) विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे (Domacile) प्रमाणपत्र.

(९) आधार कार्ड व आधारलिंक असलेल्या बँक खात्याची छायांकित प्रत.

**फ्री-शिप—**

(१) अर्जासोबत जातीचे प्रमाणपत्र.

(२) टी. सी. व गुणपत्रिका.

**भारत सरकारच्या शिष्यवृत्ती वितरणाची पद्धत—**

(अ) शिष्यवृत्तीस पात्र होण्याकरिता ७५% उपस्थिती आवश्यक आहे.

(ब) शासनाकडून वेळेत अनुदान प्राप्त झाल्यास मागील वर्षी ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड आहे तो विद्यार्थी एत्‌दर्थ अनुदानास पात्र राहणार नाही.

**संस्थेत खालील शिष्यवृत्त्या व पारितोषिके उपलब्ध आहेत—**

१. खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती : कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांसाठी.

२. महाराष्ट्र शासनाची दक्षिणा फेलोशिप.

३. शासकीय संशोधन फेलोशिप (एक).

४. महाराष्ट्र शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.

५. एकलव्य शिष्यवृत्ती.

६. अल्पसंख्याक शिष्यवृत्ती करिता mahadbtmahait.gov.in या संकेत स्थळावर Online अर्ज करावा.

७. **पाली आवश्यक व पाली साहित्य विषयात प्रोत्साहनपर पारितोषिक—**

संस्थेतील पाली व प्राकृत विभागातील बी.ए. (सत्र १ ते ६) पदवीला पाली आवश्यक व पाली साहित्य विषयात सर्वाधिक गुण घेऊन उत्तीर्ण होणा-या नियमित विद्यार्थ्याला सत्र २०२३-२०२४ करिता आई-वडील

आयु. राधाबाई तुळशीराम कुंभारे व आयु. तुळशीराम चीन्नुजी कुंभारे यांचेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर व तथागत गौतम बुद्ध प्रोत्साहनपर पारितोषिक प्रत्येकी रु. १,१०० (रुपये एक हजार एकशे फक्त) व संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

**अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-**

१. विद्यार्थी पदवीला (बी.ए. सत्र १ ते ६) संस्थेचा नियमित विद्यार्थी असावा.

२. विद्यार्थ्याने तीन वर्षात पदवी उत्तीर्ण केलेली असावी, शिक्षणात खंड नसावा.

३. विद्यार्थी संस्थेतील पाली व प्राकृत विभागातून पाली आवश्यक किंवा पाली साहित्यात तिन्ही वर्षात सार्वाधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

४. दोन किंवा दोनपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना पाली आवश्यक किंवा पाली साहित्यात सर्वाधिक गुण असतील तर पारितोषिक विभागून देण्यात येईल.

५. अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संस्थेचे मा. संचालक, विभाग प्रमुख व पारितोषिक समितीला राहील.

८. **संस्कृत आवश्यक व संस्कृत साहित्य विषयात प्रोत्साहनपर पारितोषिक—**

संस्थेतील संस्कृत विभागातील बी.ए. (सत्र १ ते ६) पदवीला संस्कृत आवश्यक व संस्कृत साहित्य विषयात सर्वाधिक गुण घेऊन उत्तीर्ण होणा-या नियमित विद्यार्थ्याला सत्र २०२३-२०२४ करिता आई-वडील श्री. रामधन तुकाराम पवार (आरंभीकर) व सौ. लिला रामधन पवार (आरंभीकर) यांचेमार्फत प्रोत्साहनपर पारितोषिक प्रत्येकी रु. १,१०० (रुपये एक हजार एकशे फक्त) व संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

१. विद्यार्थी पदवीला (बी.ए. सत्र १ ते ६) संस्थेचा नियमित विद्यार्थी असावा.

२. विद्यार्थ्याने तीन वर्षात पदवी उत्तीर्ण केलेली असावी, शिक्षणात खंड नसावा.

३. विद्यार्थी संस्थेतील संस्कृत विभागातून संस्कृत आवश्यक किंवा संस्कृत साहित्यात तिन्ही वर्षात सार्वाधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.

४. दोन किंवा दोनपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना संस्कृत आवश्यक किंवा संस्कृत साहित्यात सर्वाधिक गुण असतील तर पारितोषिक विभागून देण्यात येईल.

५. अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार संस्थेचे मा. संचालक, विभाग प्रमुख व पारितोषिक समितीला राहील.

वरील शिष्यवृत्त्या व पारितोषिके या संबंधीची माहिती वेळोवेळी जाहीर केली जाईल.

**११. महत्त्वाचे नियम :**

१. विद्यार्थ्याला चालू शैक्षणिक वर्षात फक्त एकदाच बोनाफाईड प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतरच्या प्रमाणपत्राच्या प्रत्येक प्रतीसाठी रु. २५ शुल्क भरावे लागेल.

२. विद्यार्थ्याला डुप्लीकेट टी. सी. करिता न्यायालयाचे शपथपत्र व टी. सी. हरविल्याची पोलीस स्टेशनला तक्रार केल्याची प्रत सादर करावी लागेल. तसेच सोबत रु. ५० शुल्क भरावे लागेल.

३. संस्था सोडल्यावर ५ (पाच) वर्षाचे आत मूळ टी. सी. करिता अर्ज करावा. अन्यथा पाच वर्षानंतर टी. सी. ची मागणी केल्यास नंतरच्या प्रत्येक वर्षासाठी रु. २० प्रमाणे रक्कम भरावी लागेल.

४. वर्ग ११, १२, बी. ए. आणि एम. ए. पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना चाचणी परीक्षा (Test Exam.) देणे बंधनकारक आहे. परीक्षेला अनुपस्थित राहिल्यास प्रती पेपर दंड आकारण्यात येईल. दंडाची रक्कम निर्धारित करण्याचा अंतिम निर्णय संचालकांचा राहील.

५. विद्यार्थ्यांची प्रत्येक वर्गातील उपस्थिती ७५% असणे आवश्यक आहे. कमी उपस्थिती असल्यास, विद्यापीठ/बोर्डाच्या परीक्षेत बसता येणार नाही.

६. अर्जावर स्वतःची तसेच आई-वडील/पालकाची सही असावी. जर आई-वडील/पालक यांची निशाणी अंगठा असेल तर तो योग्यरितीने प्रमाणित करून घ्यावा.

*७. विद्यार्थी, एखाद्या परीक्षेस दुस-यांदा बसत असेल तर त्याला ही सवलत मिळू शकत नाही. परंतु ती परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर ही सवलत पुन्हा मिळू शकेल.

८. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकारची मॅट्रिक पुढील शिक्षणाची शिष्यवृत्ती घेतल्यास, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गासाठी असलेली निःशुल्क शिक्षणाची सवलत त्याला मिळणार नाही.

*९. विद्यार्थ्याची वर्गातील उपस्थिती किमान ७५% टक्के असणे आवश्यक आहे. ती त्यापेक्षा कमी असल्यास, त्याला त्या सत्राची फी भरावी लागेल आणि फी ची सवलत मिळणार नाही. जर विद्यार्थ्याची प्रगती व वर्गातील उपस्थिती समाधानकारक नसेल तर वरील फी माफीची सवलत मागे घेण्यात येईल.

१०. विद्यार्थ्याने जर चुकीची माहिती दिली किंवा उत्पन्नाचा खोटा दाखला देऊन एकाच वेळी दोन अभ्यासक्रमांसाठी फी माफीची सवलत घेतली तर घेतलेल्या सवलतींच्या दुप्पट रक्कम त्यांचेकडून वसूल करण्यात येईल.

११. सर्व शिष्यवृत्ती व शिक्षणशुल्क धारक विद्यार्थ्यांनी अर्जासोबत ७५% उपस्थिती प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

## १२. शारीरिक शिक्षण विभाग

### १२.१. वैद्यकीय तपासणी :

(क) विद्यापीठाच्या नियमानुसार संस्थेतील प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाने मान्यता दिलेल्या वैद्यकीय अधिका-यांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे. तपासणीची तारीख संचालक व वैद्यकीय अधिकारी ठरवतील. पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना हे लागू नाही.

(ख) जर एखाद्या विद्यार्थ्याला वैद्यकीय अधिकारी निर्दिष्ट करतील त्या दिवशी व त्यावेळी तपासणी करून घेतली नाही तर अशा विद्यार्थ्याचे नाव संचालकांमार्फत वैद्यकीय अधिकारी विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाकडे कळवतील व तो विद्यार्थी नियमानुसार कारवाईस पात्र होईल.

(ग) संस्थेत प्रवेश घेताच प्रत्येक विद्यार्थ्याने त्याला दिल्या जाणा-या "अ" नमुन्यात स्वतःच्या आरोग्याचे निवेदन दिले पाहिजे.

(घ) विद्यापीठ कार्यकारी मंडळाने नेमलेल्या वैद्यकीय अधिका-यांकडून वैद्यकीय तपासणी करिता प्रत्येक विद्यार्थ्याला विद्यापीठाने निश्चित केलेले शुल्क भरावे लागेल.

### १२.२. शारीरिक क्षमता चाचणी :

(१) शारीरिक क्षमता चाचणी १५ ते ३१ जानेवारी या काळात घेण्यात येईल.

(२) जर एखादा विद्यार्थी निर्धारित केलेल्या नियमानुसार चाचणीला हजर राहिला नाही तर तो योग्य त्या कार्यवाहीस पात्र राहील.

**१२.३. खेळाडूंना प्रोत्साहन गुण :–** रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचे परिच्छेद क्र. ०२ (१९९६) नुसार आंतर-महाविद्यालयीन व आंतर-विद्यापीठ स्पर्धेत भाग घेणा-या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त २५ क्रेडिट गुण प्रोत्साहन म्हणून देण्यात येतील.

गुणांची विभागणी खालीलप्रमाणे आहे.—

१. आंतर महाविद्यालयीन स्पर्धा–१० गुण

२. आंतर-महाविद्यालयीन स्पर्धा–प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान–१५ गुण

३. आंतर-विद्यापीठ स्पर्धा–२५ गुण

## १३. राष्ट्रीय छात्र सेना (National Cadet Corps) NCC :—

(१) शैक्षणिक सत्र २०१४-१५ पासून संस्थेत राष्ट्रीय छात्रसेनेचा १०० विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र युनिट मंजूर झाला असून, इच्छूक विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित झाल्यानंतर त्वरित संस्थेतील राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

(२) ज्याची राष्ट्रीय छात्र सेनेत अगर शारीरिक शिक्षणासाठी निवड करण्यात आली असेल त्यांनी सत्रामध्ये छात्र सेनेच्या होणा-या कवायतींपैकी ८० टक्के कवायतींना व वार्षिक शिबिरांना अगर शारीरिक शिक्षणाच्या होणा-या तासांपैकी ८० टक्के तासांना उपस्थित राहिलेच पाहिजे.

(३) ज्या विद्यार्थ्याची उपस्थिती वरील क्रमांक (२) मध्ये नमूद केल्यापेक्षा कमी असेल अशांना विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षेस बसण्याची अनुज्ञा दिली जाणार नाही. काही अनिवार्य कारणांमुळे उपस्थिती कमी झाल्यास, अशांच्या बाबतीत गुणवत्तेवर विचार केला जाईल. मात्र याबाबतीत संचालकांनी घेतलेला निर्णय अंतिम राहील.

(४) राष्ट्रीय सेवा योजना निवडलेल्या विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या कँपला उपस्थिती नंतर प्रोत्साहित गुणांचे मुल्यांकन केले जातील. विद्यापीठाद्वारे ठरविलेले पूर्ण गुण १० आहेत.

**१४. राष्ट्रीय सेवा योजना (National Service Scheme) NSS :—**

* संस्थेत २५० विद्यार्थी संख्या असणारे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वतंत्र यूनिट आहे. या विभागातर्फे नियमित व शिबीर कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

* विभागातील सक्रिय विद्यार्थ्यांना विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील शिबीरात सहभागी होण्याची संधी देण्यात येते.

* एनएसएस सहभागी विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे कमाल १० गुण प्रोत्साहन पर दिले जातात.

**१५. स्काऊट व गाईड :—**

या युनिटद्वारा आपदा प्रबंधन, पर्यावरण संरक्षण, राष्ट्रीय एकात्मता, साहसिक कौशल्य, ध्यान योगा आत्मरक्षण, भारतीय संस्कृती, संस्कार, प्रथमोपचार, आत्मसंयम, ग्राम प्रबंधन, इंद्रिय संयम, प्राथमिक आर्थिक व्यवहार, अनुशासन, नेतृत्वगुण अशा सद्‌गुणांचे प्रशिक्षण दिले जाते.

- प्रत्येक विद्यार्थ्यांची नोंदणी फी १० रु.
- कॅम्प फी ५०० रु.
- या उपक्रमासाठी संस्थेच्या शैक्षणिक वेळापत्रकाशिवाय अन्य वेळेत/कालावधीत सदर उपक्रम राबविण्यात येतात.
- प्रवेशित बी. ए. प्रथम, द्वितीय, तृतीय चा विद्यार्थी यात सहभाग घेऊ शकतो.
- अन्य युनिट चे सभासदत्व असले तरीही विद्यार्थी या युनिट चा सदस्य होऊ शकतो.
- युनिट द्वारा प्रवेश, प्रथम सोपान, द्वितीय सोपान, तृतीय सोपान अभ्यासक्रम राबविण्यात येतात.
- स्काउट-गाईड कोटानुसार रेल्वे भरतीमध्ये अशा विद्यार्थांना प्राधान्यक्रम देण्यात येते.

**१६. विद्यार्थी कल्याण योजना :**

(१) **कमवा आणि शिका योजना (Earn and Learn Scheme) :—** संस्थेमार्फत गरीब, परंतु हुशार विद्यार्थ्यांसाठी “कमवा आणि शिका” योजना सुरू करण्यात आलेली आहे. या योजनेच्या मार्फत संस्थेमधील हुशार व गरजू विद्यार्थ्यांना विविध कामे दिली जातात. या बदल्यात त्यांना कामाचा मोबदला दिला जातो. सदर गरजू विद्यार्थ्यांना संस्थेमार्फत तसेच संस्थेच्या व्यतिरिक्त इतरही अन्य संस्थांमार्फत उपलब्ध होणारी कामे दिली जातात. विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा निर्माण करणे हा योजनेचा प्रमुख उद्देश आहे.

(२) **नोकरी मार्गदर्शन केंद्र :–** संस्थेमध्ये नोकरी मार्गदर्शन केंद्र (Employment Cell) सुरू केले आहे.

(३) **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र :–** विद्यार्थ्यांचा प्रशासकीय सेवेमधील सहभाग वाढावा म्हणून या संस्थेमार्फत “स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र ” सुरू करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जाणा-या पूर्व व मुख्य परीक्षेचे मार्गदर्शन या केंद्रामार्फत केले जाते. ज्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवेश हवा आहे त्यांनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या प्रमुखांशी संपर्क साधावा.

(४) **महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई अंतर्गत महिला तक्रार निवारण समिती (ICC) :–** या संस्थेत वरिष्ठ महाविद्यालयीन महिला संघ (Women Cell) अस्तित्वात आहे. प्रत्येक विद्यार्थीनी त्याची सदस्य असते. मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यक्रम आयोजित करणे या उद्देशाने महिला संघाची स्थापना झालेली आहे. महिला संघाच्या सर्व कार्यक्रमात मुलींचा सक्रिय सहभाग व सहकार्य अपेक्षित आहे. याप्रमाणे संस्थेत भेदभाव विरोधी सेल समान संधी सेल, अल्पसंख्याक विद्यार्थी सेल, विद्यार्थी कल्यान समिती आहेत.

मुलींना व स्त्रियांना त्यांच्या मूलभूत गरजा, शिक्षण, राजकीय सहभाग, त्याचबरोबरीने समाजात समान नागरिकत्व प्राप्त करण्यामध्ये मूलतः लैंगिक हिंसेची भिती आणि होणारी हिंसा यामुळे प्रतिबंध निर्माण होत आहे. हिंसा ओळखून त्याचा प्रतिकार करण्यासाठी हिंसेची समज व सविस्तर माहिती ज्ञात असणे आवश्यक आहे.

युवक व पुरुषांना आपण जे वागतोय त्यात हिंसा असू शकते याची जाणीव करून देणेही गरजेचे आहे. समाजातील तरुणांची वैचारिक समज व मानसिकता स्त्रियांच्या दृष्टीने सकारात्मक करणे ही काळाची गरज आहे. या दृष्टीने ही समिती काम करते.

**१७. सामान्य नियम :**

१. वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था ही शासकीय संस्था असून या संस्थेतील मालमत्ता शासनाची आहे. तिची कोणत्याही प्रकारे हानी करणे हा कायद्यानुसार दखलपात्र गुन्हा आहे.

२. या संस्थेतील संचालक, प्राध्यापक व इतर शिक्षकेतर कर्मचारी हे महाराष्ट्र शासनाचे काम करीत असतात. त्यांच्या कामात कोणत्याही प्रकारे अडथळा आणणे हा गुन्हा आहे. संस्थेच्या परिसरात शिस्त पाळणे आवश्यक आहे. अन्यथा योग्य ती कार्यवाही केली जाईल.

३. संस्थेच्या कोणत्याही भांडारगृहात विद्यार्थ्यांनी परवानगीशिवाय प्रवेश करण्यास मनाई आहे. त्यांना लागणारी उपकरणे, प्रयोगांचे साहित्य इ. संबंधित परिचारकाद्वारे पुरविली जातील.

४. प्रयोगशाळेत करावयाच्या प्रयोगांसाठी दिलेल्या साधनसामग्रीची जबाबदारी व्यक्तिशः संबंधित विद्यार्थ्यांची राहील. कोणत्याही टाळता येणा-या कारणांमुळे झालेली तुटफूट विद्यार्थ्याला भरून द्यावी लागेल.

५. संस्थेच्या परिसरात वाहने ठेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. वाहनास कुलूप लावावे. आपली वाहने संस्थेच्या अधिकृत स्टॅन्डवरच ठेवावीत. ठेकेदाराकडून त्यासाठी टोकन घ्यावा. संस्थेच्या आवारात इतरत्र वाहने ठेवण्यास सक्त मनाई आहे. हा नियम न पाळणा-यांविरूद्ध योग्य कारवाई केली जाईल.

६. विद्यार्थ्याने संस्थेच्या कार्यालयात प्रवेश करू नये. सर्व प्रकारची चौकशी नियोजित खिडकीवर बाहेरून करावी. कार्यालयीन कामाच्या दिवशी संबंधित लिपिकाकडे चौकशी करावी.

७. रेल्वे किंवा बसच्या प्रवासाची सवलत नियमानुसार दिली जाईल.

८. रॅगिंग करणे अत्यंत गंभीर अपराध असून विद्यार्थ्यांनी रॅगिंग केल्यास, सुप्रीम कोर्टाचे आदेश क्रमांक २४२९५/२००४ अन्वये प्रवेश रद्द करण्यात येईल व त्यांच्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

९. संस्थेच्या सूचनाफलकावर वेळोवेळी लावलेल्या सूचना विद्यार्थ्यांनी वाचणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे वर्गवार Whats app ग्रूप्स बनवले जातात. यावरून माहिती विद्यार्थ्या पर्यंत पोचवली जाते.

१०. संस्थेच्या वाचनालयात मुलांसाठी व मुलींसाठी अभ्यासाकरिता स्वतंत्र वाचन कक्षाची व्यवस्था केली आहे. वाचन कक्षाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा.

**१८. विद्यार्थी परिषद :**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, (२०१६) च्या अधीन राहून विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात येईल. त्या संबंधीच्या सूचना वेळोवेळी फलकावर व Whats app group च्या माध्यमातून टाकण्यात येतील.

**१९. शिस्त पालनाचे विशेष नियम :**

प्रत्येक विद्यार्थ्याने संस्थेचे शिस्तीचे खालील नियम पाळणे आवश्यक आहे.

१. प्राध्यापक, कर्मचारी व इतर विद्यार्थी यांच्याशी प्रत्येक विद्यार्थ्यांचे वर्तन सभ्यतेचे असावे.

२. संस्थेच्या प्रतिष्ठेस बाधा आणणारे कोणतेही गैरवर्तन केल्यास, असभ्यपणा व नियमांबद्दल उपेक्षा दाखविल्यास, विद्यार्थ्यांना जबर दंड द्यावा लागेल. प्रसंगी त्यांना निष्कासित देखील केले जाईल.

३. **ड्रेसकोड :**–संस्थेच्या परिसरात व कुठल्याही कार्यक्रमात आक्षेपार्ह कपडे घालू नये.

सर्व विद्यार्थ्यांना संस्थेचा गणवेष अनिवार्य करण्यात आला असून तो खालीलप्रमाणे आहे :

**पदवी** –मुले : फिका निळा शर्ट / काळी पॅन्ट

मुली : फिका निळा रंग शर्ट / कुर्ता व (काळी पॅन्ट / सलवार)

**पदव्युत्तर** –मुले : ग्रे रंगाचा रेघांचा शर्ट / काळी पॅन्ट

मुली : ग्रे रंगाचा रेघांचा कुर्ता / शर्ट व काळी पॅन्ट / सलवार

४. संस्थेचे वर्ग सुरू असताना वर्गासमोरील व्हरांड्यातून विद्यार्थ्यांनी निष्कारण फिरू नये तसेच कामाशिवाय संस्थेच्या परिसरात रेंगाळत राहू नये. या नियमांचे उल्लंघन केल्यास संचालकांकडून दंड केला जाईल.

५. आपल्या तासांच्या व्यतिरिक्त कोणत्याही विद्यार्थी–विद्यार्थीनींनी वर्ग खोल्यांमध्ये थांबू नये. तसेच आपल्या वर्गाच्या तासाव्यतिरिक्त अन्य वर्गाच्या तासांना बसू नये.

६. संस्थेच्या सामानाची विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारे नासधूस करू नये.

७. परिसरातील फुलझाडे आणि वृक्षवेली यांची निगा राखावी.

८. संस्थेच्या परिसरात संचालकांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणालाही छायाचित्रे घेता येणार नाहीत.

९. विद्यार्थ्यांनी संस्थेच्या परिसरामधील इमारतीच्या भिंतींवर व अन्य कुठेही कोणत्याही प्रकारचा मजकूर लिहू नये किंवा भित्तिपत्रके चिकटवू नये. तसे करताना कोणी आढळल्यास त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

१०. संस्थेच्या आवारात प्रत्येक विद्यार्थ्याने संस्थेने दिलेले ओळखपत्र बाळगावे. तपासणीकरिता त्याची मागणी केल्यास ते तात्काळ सादर करणे आवश्यक आहे. ओळखपत्राशिवाय विद्यार्थ्यांना व्याख्यानांना/तासांना/प्रात्यक्षिकांना हजर राहू दिले जाणार नाही. तसेच जिमखान्यात, ग्रंथालयात आणि वाचनकक्षात किंवा इतरत्र त्यास प्रवेश मिळणार नाही.

११. विद्यार्थ्यांची वर्गातील व संस्थेच्या आवारातील वर्तणूक इतरांना उपद्रव देणारी नसावी.

१२. शासकीय आदेशानुसार संस्थेच्या आवारात धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे.

१३. संस्थेच्या परिसरात कोणत्याही प्रकारचे रद्दी कागद किंवा कचरा टाकू नये. परिसर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी सर्वांनी कचरा कुंडीतच टाकून सहकार्य द्यावे.

१४. दरवर्षी स्नेहसंमेलन ‘ अंतर्नाद ’ साधारणतः डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात आयोजित केले जाते. याबाबत अंतिम निर्णय संचालकांचा राहील.

१५. संस्थेतील विद्यार्थ्यांना संस्थेच्या संचालकांच्या पूर्वानुमतीशिवाय कोणत्याही प्रकारचा निधी परस्पर गोळा करता येणार नाही.

१६. संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही कार्यक्रमाचे आयोजन करताना बाहेरच्या व्यक्तीस संचालकांच्या पूर्वानुमतीशिवाय आमंत्रण देता येणार नाही.

१७. अभ्यासक्रमांत अंतर्भूत असलेल्या शैक्षणिक सहलीव्यतिरिक्त संस्थेतील विद्यार्थ्यांच्या अध्यापनाच्या कार्यात व्यत्यय न येता सुटीच्या दिवशी किंवा कालावधीत सहली आयोजित करावयाच्या असतील तर संचालकांची पूर्वानुमती अनिवार्य राहील.

१८. पुढील कारणास्तव विद्यार्थ्यांचे नाव संस्थेतून काढून टाकण्याचा संचालकांना अधिकार आहे :—

(अ) रॅगिंग किंवा तत्सम प्रकरणात समावेश असल्यास.

(ब) सुपारीच्या गुटख्याचे वा अन्य प्लॅस्टीकचे कागद संस्थेच्या आवारात टाकल्यास.

(क) संस्थेचे शैक्षणिक, वसतिगृह व अन्य शुल्क न भरल्यास.

(ड) कारणाशिवाय एक आठवडा सतत अनुपस्थित असल्यास.

(इ) शिस्तपालनाच्या विशेष नियमांचा भंग केल्यास.

(ई) संचालकांच्या मतानुसार असमाधानकारक वर्तणूक असल्यास.

१९. सन १९९९ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ नुसार संस्थेत किंवा संस्थेबाहेर रॅगिंग घेण्यास मज्जाव करण्यात आलेला असून रॅगिंग घेणा-यास २ वर्षे कारावासाच्या व रु. १०,००० दंडाच्या शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे.

२०. या माहितीपत्रकात कोणताही बदल करणे वा नवीन नियमांचा अंतर्भाव करणे यासंबंधीचा अधिकार संचालकांना राहील व केलेला बदल वा अंतर्भाव विद्यार्थ्यांना बंधनकारक राहील.

● ● ●

शामुना—वाय-१७९-संवनाशाकससंना-०६-२०२३-१०१० प्रती-पीसी ४*

# संस्था गीत

एक हृदय एक चित्त
हेच ब्रीद आपुले
भविष्य भव्य त्याकडे
पडती ठाम पाऊले
वर्ग वंश जाती रहित
निर्मिण्यास राष्ट्र हे
सज्ज प्राण आपुले
नि सज्ज हात आपुले
अदम्य प्रेरणा ऊरी
अजिंक्य भाव सळसळे
कोटी-कोटी जन हिताय
तरुण तेज हे वळे
ज्ञान कर्म सर्व आम्ही
विश्वधर्मी अर्पिले
एक हृदय एक चित्त
युवक धीर चालले

कवी- प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध

मुद्रण- शासकीय मुद्रणालय, नागपूर